.अंध व अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष वाहन भत्ता.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक विवाभ-१३८८/सीआर-६८०/सेवा-५

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मार्च १९८९

पहा.—(१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८०.

(२). शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१०८३/सीआर-१३७५/एसईआर-५, दिनांक ४ जानेवारी १९८४.

## शासन निर्णय

वर (१) येथे निर्देशित केलेल्या शासन निर्णयान्वये अंध व हातापायांच्या विकलांगतेसहित अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याला वेतनाच्या १० टक्के पण कमाल रु. ५०/— दरमहा या दराने विशेष वाहन भत्ता मंजूर करण्यात आला आहे व वरील (२) येथे निर्देशिलेल्या शासन निर्णयान्वये सदर भत्त्याची कमाल मर्यादा रु. ७५/— दरमहा अशी वाढविण्यात आली आहे. केंद्र शासनाने चतुर्थ वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार, सदर विशेष वाहन भत्त्याचा दर, सुधारित वेतनश्रेणीचे संदर्भात मूळ वेतनाच्या ५ टक्के पण कमाल रु. १००/— दरमहा असा निश्चित केलेला आहे. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी, सुधारित वेतनश्रेणीचे संदर्भात विशेष वाहन भत्त्याचा दर निश्चित करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, अंध व हातापायांच्या विकलांगते-सहित अस्थिव्यंगाने अधू असलेल्या कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेला विशेष वाहन भत्त्याचा दर दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पासून, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ अन्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ५ टक्के पण कमाल रु. १००/— दरमहा असा असेल. जे कर्मचारी सुधारणापूर्व वेतनश्रेणी चालू ठेवण्याचा विकल्प देतील त्यांचेबाबतीत, त्यांच्या वेतनात सुधारणापूर्व वेतनश्रेणीतील मूळ वेतनाबरोबरच दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता, २ अंतरिम वाढी, अधिक मूळ वेतनाच्या २० टक्के तदर्थ वाढ (किमान रु. ७५/—) यांचा अंतर्भाव असेल. विशेष वाहन भत्त्यासंबंधीच्या शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक टीआरए-१३७९/सीआर-१७३७/एसईआर-५, दिनांक २० फेब्रुवारी १९८० मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी तशाच राहातील.

२. शासन असाही आदेश देत आहे की, दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पूर्वीच्या कालावधीसाठी विशेष वाहन भत्त्याचा दर व मर्यादा, वेतन सुधारणेनंतरही सध्याप्रमाणेच वेतनाच्या १० टक्के पण कमाल रु. ७५/— दरमहा असा असेल व त्यासाठी दिनांक १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या वेतन पुनर्रचनेपूर्वीच्या वेतनश्रेणीतीलच असुधारित वेतन विचारात घेतले जाईल.

३. या निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. स. जाधव,
शासनाचे अवर सचिव.

(शा.म.मु.) एच २७९७ (१०,०००—३-८९)

प्रती,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त विभाग-सेवा-५.

*पत्राद्वारे.

१९८९ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.

**Special Conveyance Allowance—**
**Grant of—to blind and orthopaedically handicapped employees.**

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## FINANCE DEPARTMENT

Resolution No. SCA-1388/CR-680/SER-5

Mantralaya, Bombay 400 032, dated the 8th March 1989

*Read.*—(1) Government Resolution, Finance Department, No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated 20th February 1980.

(2) Government Resolution, Finance Department, No. TRA-1083/CR-1375/SER-5, dated 4th January 1984.

## *GOVERNMENT RESOLUTION*

Under Government Resolution, Finance Department quoted at (1) above, a special conveyance allowance at 10 per cent of basic pay subject to a maximum of Rs. 50/- p. m. has been sanctioned to such Government employees as are blind or are orthopaedically handicapped with disability of lower extremities. The above maximum limit has been raised to Rs. 75/- p.m. under Government Resolution, Finance Department quoted at (2) above. On the basis of the recommendations of the Fourth Central Pay Commission, the Central Government has fixed the rate of special conveyance allowance, with reference to the revised pay-scales, at 5 per cent of the basic pay subject to a maximum of Rs. 100/- p.m. The question of revising the rate of special conveyance allowance for State Government employees in the context of the revised pay-scales was under consideration for some time. Government is pleased to direct that the rate of special conveyance allowance for the blind and orthopaedically handicapped employees including disability of hands and feet shall, with effect from 1st February 1989, be 5 per cent of the basic pay subject to a maximum of Rs. 100/- p.m. in the revised pay-scales, prescribed under Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1988. In the case of employees who opt to draw pay in the prerevised scale, their pay will include, in addition to the basic pay in the prerevised scale, the dearness allowance admissible as on 1st January 1986, amount of two interim reliefs *plus ad hoc* increase of 20 per cent of basic pay subject to a minimum of Rs. 75/-.

Other conditions for grant of special conveyance allowance prescribed under Government Resolution, Finance Department, No. TRA-1379/CR-1737/SER-5, dated 20th February 1980 will continue to operate.

2. Government is also pleased to direct that for the period prior to 1st February 1989, the rate and the maximum limit of the special conveyance allowance even after the revision of pay-scales shall be as at present i.e. 10 per cent of basic pay subject to a maximum of Rs. 75/- p.m. and for this purpose, unrevised pay in the pay-scales existing prior to revised pay-scales applicable from 1st January 1986 will be taken into consideration.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. JADHAV,
Under Secretary to Government.